परिपत्रक क्र.मुंविमं/उ.मा.प./ जून-जुलै -२०२५/ऑनलाईन आवेदनपत्र/२२३३ दिनांक ०७/०५/२०२५

विषय :- जून-जुलै - २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरतांना घ्यावयाच्या महत्त्वाच्या सूचनांबाबत.....

संदर्भ :- क्र.रा.मं./परीक्षा-३/१६२० दि. ०६/०५/२०२५ चे पत्र.

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत जून-जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणा-या **इयत्ता १२ वी** परीक्षेस पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (फेब्रुवारी- मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ठ न झालेले) व जून-जुलै- २०२५ परीक्षेसाठी नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणारे, ITI विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of credit घेणारे विद्यार्थी) अशा सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे **दि. ०७.०५.२०२५** ते **२२.०५.२०२५** या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत. (सदर कालावधीनंतर आवेदनपत्र भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ होणार नाही, याची नोंद घ्यावी.)

विद्यार्थ्यांची आवेदनपत्र अपलोड करताना खालीलप्रमाणे महत्वाच्या सूचनांचे पालन करावे.

१. पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्याची पूर्वीच्या गुणपत्रिका पाहूनच विषय नमूद करावेत व विद्यार्थ्यास एखादया विषयात सुट असल्यास तेथे सुट दर्शवावी.

२. कनिष्ठ महाविद्यालयास मान्यता असलेल्या शाखा/विषय/ माध्यमानुसारच विषय घेणे अनिवार्य आहे.

३. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना विद्यार्थी प्रकारानुसार खालीलप्रमाणे आवेदनपत्र क्रमांक देण्यात यावेत.

अ.क्र	विद्यार्थ्याचा प्रकार	आवेदनपत्र क्रमांक
१.	नियमित विद्यार्थी	०००१ ते ५०००
२.	पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी	५००१ ते ६०००
३.	खाजगी विद्यार्थी (यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले परंतु फेब्रु.-मार्च -२०२५ परीक्षेस प्रविष्ठ न झालेले विद्यार्थी व जून-जूलै २०२५ परीक्षेस नाव नोंदणी केलेले विद्यार्थी)	६००१ ते ७०००
४.	श्रेणी सुधार विद्यार्थी (फेब्रु/मार्च २०२४, जुलै/ऑगस्ट २०२४ व फेब्रु/मार्च २०२५ परीक्षेस सर्व विषय घेवून प्रविष्ठ झालेले विद्यार्थीच)	७००१ ते ८०००
५.	तुरळक विषय	८००१ ते ९०००

४. खाजगी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरतांना ज्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झाले आहेत अशाच विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र ऑनलाईन भरण्यात यावेत. तसेच खाजगी पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रात यापूर्वीचा नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) वरील क्रमांकाची अचूक नोंद करावी.

५. Online आवेदनपत्रात विद्यार्थ्याचा विषय कोड क्रमांक, उत्तराचे माध्यम कोड (Lang of Ans. Code No.) व इतर माहिती भरताना योग्य कोड नंबर अचूक नमूद करण्यात यावा. पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी पूर्वीची विषय सूट घेणार असल्यास त्याच्या सर्व गुणपत्रिका तपासून ज्या विषयात सुट आहे त्या विषयात सूट दर्शवून एकूण सुटलेल्या विषयाची संख्या नमूद करावी.

६. पर्यावरण शिक्षण (EVS) (विषय कोड क्र. ३१) व आरोग्य व शारीरिक शिक्षण (वि. कोड क्र. ३०) या विषयास आवेदनपत्रामध्ये माध्यम कोड क्रमांक नमूद केला जात नाही असे निदर्शनास आलेले आहे. तरी माध्यमाचा कोड क्रमांक न चुकता नमूद करावा.

७. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी सर्व विषय घेवून प्रविष्ठ होत असल्यास तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे विद्यार्थ्यांचे पर्यावरण शिक्षण (EVS) आरोग्य व शारीरिक शिक्षण (PT) या विषयात प्रविष्ठ दर्शविण्यात यावे व **Non Exempted** चा कोड देण्यात यावा.

८. दिव्यांग विद्यार्थ्याचा दिव्यांग प्रवर्गानुसार मंडळाने निर्धारित केलेला दिव्यांग कोड आवेदनपत्रात अचूक नमूद करावा. पुनर्परिक्षार्थी दिव्यांग विद्यार्थी व मंडळाचे दिव्यांग सवलतीबाबतचे पत्र प्राप्त झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पुनश्च सादर करण्यात येवू नये मात्र मंडळाच्या सवलतीच्या पत्राची एक प्रत मंडळाकडे दि. २६/०५/२०२५ रोजी सादर करावी.

९. आवेदनपत्र अपलोड केलेल्या खाजगी विद्यार्थ्यांची यापूर्वीची नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate)/ योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate), पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांच्या (एकापेक्षा जास्त असल्यास सर्व गुणपत्रिका), श्रेणी सुधार (C.I.S.) विद्यार्थ्याच्या गुणपत्रिका, तुरळक विषय (ISO) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांच्या छायांकित सत्य प्रतीवर आवेदनपत्र क्रमांक नोंदवून **गुणपत्रिकांचा एकत्र गठ्ठा मंगळवार, दिनांक २६/०५/२०२५ रोजी निर्धारित वितरण केंद्रावर** चलन व **यादी जमा करतेवेळी देण्यात यावेत.**

१०. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र अपलोड केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत शुल्क अचूक भरणा करावे. विहित शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

११. **फेब्रु. / मार्च २०२४, जुलै/ ऑगस्ट २०२४ व फेब्रु. /मार्च २०२५ मधील परीक्षेमध्ये एकाच वेळी सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जून-जुलै - २०२५ मधील परीक्षेसाठी श्रेणी सुधार योजनेतंर्गत आवेदन पत्र भरून परीक्षेस प्रविष्ठ होता येणार आहे.**

१२. **राज्य मंडळाच्या पत्रानुसार श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता लगतच्या तीन परीक्षेत प्रविष्ठ होता येईल. त्यानुसार फेब्रु./मार्च २०२४ परीक्षेस सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होण्याची जून-जुलै -२०२५ परीक्षेची अंतिम संधी राहील. त्यानंतर सदरच्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होता येणार नाही.**

१३. आपल्या कनिष्ठ महाविदयालयातून श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांची श्रेणीसुधार योजनेच्या नियमानुसार प्रथम प्रविष्ट झालेल्या परीक्षेचा मूळ गुणपत्रिकेतील श्रेणी विषयासह सर्व विषय, माध्यम विद्यार्थ्यांस घेणे आवश्यक असल्याने त्याची खात्री करूनच आवेदनपत्र अपलोड करावे. अशा विदयार्थ्यांचा CIS कोड - ४ आवश्यक असून जर चुकून नियमित विदयार्थ्यांचा कोड ०१ नमूद केल्यास तो श्रेणीसुधार ऐवजी नियमित विद्यार्थी होईल अशी प्रकरणे निदर्शनास आल्यास मंडळास चूकीची माहिती सादर केल्याबाबत नियमानुसार कनिष्ठ महाविदयालयाविरूद्ध गंभीर कारवाई करण्यात येईल.

१४. ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of credit घेणारे विद्यार्थी) घेवून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना मंडळाच्या दोन भाषा विषय व दोन श्रेणीचे विषय अनिवार्य आहे. त्यानुसार आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावे. ITI अंतर्गत येणारे ०४ विषयात ३५ गुण मिळून उत्तीर्ण असल्याशिवाय मंडळाचे आवेदनपत्र भरण्यात येवू नये. तसेच भाषा विषयांची मौखिक परीक्षा व दोन श्रेणी विषयांची परीक्षा जवळच्या कनिष्ठ महाविदयालयामार्फत घेऊन सदर परीक्षेचे गुण/ श्रेणी मंडळ कार्यालयात सादर करणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस बंधनकारक आहे.

टिप:-

१. **आवेदनपत्र अपलोड करताना विद्यार्थ्यांचे संपूर्ण नांव /आईचे नांव व जन्म तारखेची नोंद व इतर माहिती जनरल रजिस्टर वरील नोंदीप्रमाणेच अचूक भरावी.**

२. **बँक स्टेटमेंटमध्ये शुल्काची रक्कम वर्ग झाल्याची खात्री करून बँक स्टेटमेंटवरील प्रिटेंट UTR NO. चलन व परिशिष्ट "अ " वर नोंदविण्यात यावा. तसेच सदरच्या विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम आपल्या बँक खात्यावर जमा झाल्यास सदरच्या शुल्काची रक्कम मंडळाकडे त्वरित परत वर्ग करण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.**

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र.विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई- ४०० ७०३.